रायगडातून ३,५४४ कोटींचे मुद्रांक शुल्क जमा

वर्षभरात १ लाख ६५ हजार ३१ दस्तांची नोंद; गेल्या वर्षीच्या तुलनेत ३३८ कोटींची वाढ

हर्षद कशाळकर, लोकसत्ता

अलिबाग : रायगड जिल्ह्यात २०२४-२५ या आर्थिक वर्षात जागा जमिनींच्या व्यवहारातून ३ हजार ५४४ कोटी रुपयांचा महसूल मुद्रांक शुल्काच्या रूपाने जमा झाला आहे. गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत वर्षभरात जवळपास ३३८ कोटींची भर पडली आहे. अभय योजना आणि उत्तर रायगडमध्ये जागा जमिनींच्या व्यवहारात झालेली वाढ यामुळे महसुलात भर पडली आहे.

गेली तीन वर्षं रेडी रेकनरचे दर स्थिर होते. मात्र तरीही जिल्ह्यातील मुद्रांक शुल्कातून मिळणाऱ्या महसुलाचा आखेल चढता राहिला आहे. दक्षिण मुंबईशी रायगड जिल्ह्याची कनेक्टिव्हिटी वाढल्याने, येथील जमिनींना असलेली मागणी वाढली आहे. त्यामुळे जागा खरेदीचे प्रमाण वाढले आहे. ज्याचा एकत्रित परिणाम मुद्रांकातून येणाऱ्या महसुलावर झाला आहे.

सन २०२२-२३ या वर्षात रायगड जिल्ह्यातून २ हजार ४५० कोटींचा मुद्रांक जमा झाला होता. सन २०२३-२४ मध्ये ३ हजार २०६ कोटी रुपयांचा महसूल मुद्रांक शुल्काच्या रूपाने शासनाला प्राप्त झाले होते. तर २०२४-२५ या आर्थिक वर्षात ३ हजार ५४४ कोटींचा महसूल मुद्रांक शुल्कातून जमा झाला आहे. त्यामुळे मुद्रांकातून जमा होणाऱ्या महसुलात लक्षणीय वाढ होत असल्याचे दिसून येत आहे.

जिल्ह्यात मुद्रांक शुल्काचा सर्वाधिक महसूल हा पनवेल आणि उरण परिसरातून येत आहे. पनवेलमधील पाच दुय्यम निबंधक कार्यालयांतून जवळपास सोळाशे कोटींचे मुद्रांक शुल्क जमा झाले. त्या खालोखाल जेएनपीटी ८०० कोटींचे मुद्रांक शुल्क प्राप्त झाले आहे. अलिबाग, कर्जत, खालापूर या परिसरातून मुद्रांक जमा होण्याचे प्रमाण वाढले आहे.

-श्रीकांत सोनवणे, मुद्रांक जिल्हाधिकारी, रायगड

शिक्षकेतर पदभरतीचा मार्ग मोकळा

कनिष्ठ लिपिक, प्रयोगशाळा सहायक नामनिर्देशनाने भरण्यास मान्यता

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : राज्यातील मान्यताप्राप्त खासगी अंशतः, पूर्णतः अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील कनिष्ठ लिपिक, पूर्णवेळ ग्रंथपाल, प्रयोगशाळा सहायक या संवर्गातील पदे अनुकंपा नियुक्तीसह १०० टक्के नामनिर्देशनाने भरण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे.

शिक्षक भरतीच्या धर्तीवर शिक्षकेतर पदांनाही एकूण रिक्त पदांच्या ८० टक्के पदभरतीची अट लागू करण्यात आली असून, या निर्णयामुळे शिक्षकेतर पदांच्या भरतीचा मार्ग मोकळा झाला आहे.

शालेय शिक्षण विभागाने याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. राज्यातील मान्यताप्राप्त खासगी अंशतः, पूर्णतः अनुदानित माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी सुधारित आकृतिबंध लागू करण्यात आला आहे.

राज्यात २१ वर्षांनी शिक्षकेतर पदांवर भरती होणार आहे. त्यासाठी अनेक वर्षे लढा द्यावा लागला. या भरतीमुळे शाळांतील प्रशासकीय काम चांगल्या पद्धतीने होईल, तसेच शिक्षकांवरील ताण कमी होईल. सुमारे ५ हजार पदांवर भरती होण्याची शक्यता आहे.

-शिवाजी खांडेकर, सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षक संघटना महामंडळ

कंत्राटी नियुक्तीस राज्य सफाई कर्मचारी आयोगाचा विरोध

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नागपूर : सर्व सरकारी कार्यालयात सध्या सरसकट कंत्राटी सफाई कर्मचाऱ्यांची (चतुर्थश्रेणी) नियुक्ती केली जात आहे. नागपुरातील प्रस्तावित जिल्हा रुग्णालयातही कंत्राटी व बाह्यस्त्रोत पद्धतीने कर्मचारी घेतले जाणार आहेत. परंतु, या कंत्राटी नियुक्तीला राज्य सफाई कर्मचारी आयोगाचा विरोध आहे, अशी भूमिका आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग ऊर्फ सतीश डागोर यांनी शुक्रवारी नागपुरातील आरोग्य उपसंचालक कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत मांडली.

आयोगाच्या अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारल्यावर कंत्राटी भरतीला विरोध असल्याबाबतचे पत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिल्याचेही डागोर यांनी सांगितले. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात सफाई कामगारांच्या प्रश्नावर आढावा बैठक घेतली जात आहे. याबाबतचा अहवाल करून शासनाला सादर केला जाईल. त्यात बाह्यस्त्रोत व कंत्राटी भरतीऐवजी स्थायी पदे भरण्यासाठीचा आग्रह धरणार असल्याचेही डागोर म्हणाले.

परिवहन विभागाच्या जमिनीचे सर्वेक्षण

मुंबई : राज्यभरात विविध ठिकाणी परिवहन विभागाच्या जमिनी आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून या जमिनीवर अतिक्रमण झाले आहे. याबाबत स्थानिक अधिकाऱ्यांनी सर्वेक्षण करून या जमिनी अतिक्रमण मुक्त करून, परिवहन विभागाच्या ताब्यात घ्याव्यात, असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.

परिवहन आयुक्त कार्यालयात परिवहन विभागाची आढावा बैठक नुकतीच पार पडली. यावेळी परिवहनमंत्री प्रताप सरनाईक, आयुक्त विवेक भीमनवार व सर्व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. परिवहन विभागाच्या बहुतेक जमिनींवर अतिक्रमण झाले आहे. भविष्यात तेथे अतिक्रमण होणार नाही याची खबरदारी घ्यावी, अशी सूचना सरनाईक यांनी परिवहन विभागाला केली.

राज्यात वक्फच्या ६० टक्के जमिनींवर अतिक्रमण

मुंबई : मुस्लिम समाजाच्या विकासासाठी असलेल्या राज्यातील वक्फ बोर्डाच्या ६० टक्क्यांहून अधिक जमिनींवर अतिक्रमण झाल्याची बाब समोर आली आहे. वक्फ जमिनींविषयीचे विधेयक संसदेत मंजूर झाल्यानंतर आता राज्यातील जमिनींवरील ही अतिक्रमणे सरकार हटविणार आहे. यासाठी जीआयएस मॅपिंग केले जाणार असून या अतिक्रमित जागा ताब्यात घेऊन त्यावर निवासी, तसेच व्यावसायिक अस्थापने उभी केली जाणार आहेत. यातून येणारा निधी मुस्लिम समाजाच्या विकासासाठी वापरला जाणार आहे.

राज्यात सुमारे ३७ हजार हेक्टरवर वक्फ बोर्डाची जमीन आहे. यामध्ये सर्वाधिक १५८७७ मालमत्ता म्हणजे २३ हजार १२१ हेक्टर जमीन ही संभाजीनगर विभागात आहे. मात्र यातील ६० टक्क्यांहून अधिक जमिनीवर अतिक्रमण झाले आहे. त्यापाठोपाठ पुण्यामध्ये २,७२८ मालमत्ता ३७२४.५५ हेक्टर जमीन, नागपूर विभागात ४७० मालमत्ता ३,७०४.२५ हेक्टर जमीन, नाशिकमध्ये १४५५ मालमत्ता ३३४० हेक्टर जमीन, कोकण विभागात १७२४ मालमत्ता २३३९ हेक्टर जमीन, अमरावती विभागात १३१० मालमत्ता ११०२ हेक्टर जमीनीवर विस्तारल्या आहेत. या जमिनींवर ५० टक्क्यांहून अधिक जमिनी या अतिक्रमणाच्या विळख्यात आहेत.

वक्फ बोर्डाच्या या जमिनींवरील अतिक्रमण हटविण्यासाठी या मालमत्तांचे जीआयएस मॅपिंग केले जाणार आहे. यासाठी निविदाही काढण्यात आल्या असून लवकरच याचे कार्यादेश काढण्यात येणार आहेत. जीआएस मॅपिंगसाठी हैदराबादमधील निजामकालीन दस्तऐवजांचा आधार घेतला जाणार आहे.

गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड
(पूर्वीची पुनावाला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात असलेली)
नोंदणीकृत कार्यालय : ६वा मजला, बी-बिल्डिंग, गंगा टूईनो बिझनेस पार्क, लोहेगाव, पुणे-४११ ०१४.

सरफेसी ॲक्ट, २००२च्या सेक्शन १३(२) अंतर्गत मागणी सूचना

तुम्ही, याखाली नमूद केलेले ऋणको/ सह-ऋणको/ हमीदार, **गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेडकडून (पूर्वीची पुनावाला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात असलेली, १७ नोव्हेंबर २०२३च्या प्रभावापासून पुनावाला हाऊसिंग फायनान्स लिमिटेडचे नाव गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड असे बदलले असल्याने (पूर्वीची मॅग्मा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात असलेली आणि मूळ जीई मनी हाऊसिंग फायनान्स पब्लिक अनलिमिटेड कंपनी या नावाने विधि संस्थापित)** यापुढे सुरक्षित धनको म्हणून संदर्भित, तुमची स्थावर मालमत्ता गहाण ठेवून मालमत्ता सुविधानुसार गृहकर्ज/ कर्जांचा लाभ घेतला आहे. तुम्ही रकमेची परतफेड करण्यास कसूर दाखविली आहे, त्यामुळे तुमच्या कर्जाचे नॉन-परफॉर्मिंग ॲसेट्स म्हणून वर्गीकरण करण्यात आले होते. शेवटच्या ज्ञात पत्त्यावर थकीत देणींच्या वसुलीकरिता सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२च्या सेक्शन १३(२) अंतर्गत पाठविलेल्या मागणी सूचना न पोहोचताच परत आल्या आहेत. म्हणून त्यातील समाविष्ट तपशील सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल ३(१) वासह वाचलेल्या ॲक्टच्या सेक्शन १३(२)नुसार आणि तुम्हाला पर्यायी सेवा म्हणून वासह प्रसिद्ध करण्यात येत आहे. ऋणको, सह-ऋणको, हमीदार, प्रतिभूती, थकीत देणी, मागणी सूचनेचा तपशील सेक्शन १३(२) अंतर्गत पाठविला आहे आणि दावा केलेली रक्कम याखाली नमूद करण्यात आली आहे :

अ. क्र.	ऋणको, सह-ऋणको, हमीदाराचे नाव/ कर्ज रक्कम	सुरक्षित मत्तेचा तपशील	मागणी सूचना तारीख / देय रक्कम (रु.त)
१.	**प्रदीपकुमार मंगो पाटील, स्वाती प्रदीप पाटील कर्ज रक्कम : रु. ७,१४,०००/- लोन नं. : HL00117000000005045869**	पुढील जमीन मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे : जमीन मालमत्ता असलेला जीपीएच नं. ४८/३, मोजमापाचा एरिया ८०० चौ.फू. आणि जीपीएच नं. ४८/२, मोजमापाचा एरिया ८०० चौ.फू., वरसाडे प्र बोच्या ग्रामपंचायतच्या स्थानिक मर्यादेत व येथे स्थित- वरसाडे प्र. बो., ता. पाचोरा व जि. जळगाव. **चार सीमा जीपीएच नं. ४८/२ पूर्व :** माधवराव तुकाराम पाटील यांची मालमत्ता, **पश्चिम :** श्रीपाल मंगो पाटील यांची मालमत्ता, **उत्तर :** रोड, **दक्षिण :** दिनकर शामराव पाटील यांची मालमत्ता. **चार सीमा जीपीएच नं. ४८/३ पूर्व :** माधवराव तुकाराम पाटील यांची मालमत्ता, **पश्चिम :** श्रीपाल मंगो पाटील यांची मालमत्ता, **उत्तर :** रोड, **दक्षिण :** दिनकर शामराव पाटील यांची मालमत्ता.	**३१.०३.२०२५** रु. ७,७१,२३७/- (रुपये सात लाख एकाहत्तर हजार दोनशे सदतीस फक्त) परतफेडीपर्यंत १४.६०% प्र. व. दराने पुढील व्याजासह एकत्रित.

तुम्ही ऋणको/ सह-ऋणको/ हमीदारांना त्यामुळे या सूचनेच्या ६० दिवसांच्या आत पूर्णतः वर नमूद केल्यानुसार पुढील व्याजासह मागणी रकमेचे प्रदान करण्याकरिता फर्माविण्यात आले आहे. त्यास असमर्थ ठरल्यास निम्नस्वाक्षरीकारास वर नमूद केलेल्या प्रतिभूतींवर ताबा घेण्याकरिता ॲक्टअंतर्गत कारवाई करण्यास भाग पडेल. कृपया नोंद घ्यावी की, उक्त ॲक्टच्या सेक्शन १३(१३)नुसार, तुम्हास दरम्यानच्या कालावधीत आमच्या संमतीशिवाय विक्री, भाडेपट्टा किंवा अन्यथा कोणत्याही तऱ्हेने वरील संदर्भित प्रतिभूतींच्या हस्तांतरणापासून प्रतिबंधित केले आहे.

स्थळ : जळगाव
दिनांक : ०५.०४.२०२५

स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी
गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (पूर्वीची पुनावाला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात असलेली)

निडो होम फायनान्स लिमिटेड
(आधी एडलवाइस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) नोंदणीकृत कार्यालय टॉवर ३, ५वा मजला, विंग बी, कोहिनूर सिटी मॉल, कोहिनूर सिटी, किरोल रोड, कुर्ला (पश्चिम), मुंबई-४०००७० येथे स्थित आहे. प्रादेशिक कार्यालय येथे आहे: कार्यालय क्रमांक ४०७-४१०, ४था मजला, काकडे बिझ आयकॉन, सीटीएस २६८७बी, गणेशखिंड रोड, भांडुर्डे, शिवाजीनगर, पुणे, महाराष्ट्र ४११०१६.

सरफेसी कायदा, २००२ च्या कलम १३(२) अंतर्गत मागणी सूचना

सूचना याद्वारे देण्यात आली आहे की, खालील कर्जदारांनी निडो यांच्याकडून मिळवलेल्या कर्ज सुविधांच्या मुद्दल आणि व्याजाची परतफेड करण्यात कसूर केली आहे आणि सांगितलेली कर्ज खाती नॉन परफॉर्मिंग ॲसेट्स (एनपीए) म्हणून वर्गीकृत केली गेली आहेत. त्यांना त्यांच्या शेवटच्या ज्ञात पत्त्यावर सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (सरफेसी कायदा) च्या सेक्शन १३(२) अंतर्गत डिमांड नोटीस जारी करण्यात आली होती. सदर निर्देशित मागणी सूचनेव्यतिरिक्त, त्यांना या सार्वजनिक सूचनेद्वारे कळविण्यात आले आहे.

कलम १३(२) अंतर्गत पाठवलेले कर्जदार, सिक्युरिटीज, थकबाकी, मागणी सूचना आणि त्याअंतर्गत दावा केलेल्या रकमेचे तपशील खालीलप्रमाणे दिले आहेत :

१. कर्जदार, सह-कर्जदार, जामीनदार आणि कर्जाची रक्कम यांचे नाव आणि पत्ता :-

प्रवीण फकिरा हुमान (कर्जदार) आणि ताराबाई फकिरा हुमान (सह-कर्जदार) निवासी पत्ता : फ्लॅट क्र. २, पहिला मजला बालाजी प्राइड अपार्टमेंटमध्ये, भगवानबाबानगर पेठ रोड, प्लॉट क्र. ३ यावर, अ. क्र. ४०६/२, मखमलाबाद, ता. आणि जि. नाशिक ४२२ ००३. **एलएएन क्र.: एनएसकेएसटीएच०००००९६२६३ कर्ज करार तारीख : २८.०२.२०२३**
कर्जाची रक्कम : रु. २४,९६,०००.००/- (रुपये चोवीस लाख शहाण्णव हजार फक्त).
एनपीए तारीख : ०६.०३.२०२५ **मागणी सूचना तारीख :-** १२.०३.२०२५
देय रक्कम रु. २५,९२,८९३.९९/- (रुपये पंचवीस लाख ब्याण्णव हजार आठशे त्र्याण्णव आणि एकोणीस पैसे फक्त) **डिमांड नोटीस दि. १२.०३.२०२५** च्या तारखेपासून पुढील व्याजासह.

मालमत्तेचे परिशिष्ट :- पहिल्या मजल्यावर फ्लॅट क्र. २, बालाजी प्राइड अपार्टमेंटमध्ये कार्पेट एरिया ५५.२० चौ. मीटर, आणि वापरण्यायोग्य बाल्कनी ११.३५ चौ. मीटर, पेठ रोड, प्लॉट क्र. ३ अ. क्र. ४०६/२ मखमलाबाद ता. आणि जिल्हा. नाशिक ४२२००३ नाशिक महानगरपालिका, नाशिकच्या हद्दीत.

म्हणून तुम्हाला, वरील कर्जदाराला, या सूचनेच्या ६० दिवसांच्या आत वरील नमूद केल्याप्रमाणे थकबाकी भरण्याचे आवाहन करण्यात आले आहे, असे न केल्यास निम्नस्वाक्षरीकार यांना वर नमूद केलेल्या सिक्युरिटीजची अंमलबजावणी करण्यासाठी सरफेसी कायद्यांतर्गत कारवाई करण्यास भाग पाडले जाईल. कृपया लक्षात घ्या की, वरील निर्देशित कायद्याच्या कलम १३(१३) यानुसार, तुम्हाला वरील संदर्भित सिक्युरिटीज विक्री, भाडेपट्ट्याने किंवा आमच्या संमतीशिवाय हस्तांतरित करण्यापासून प्रतिबंधित केले आहे.

ठिकाण : नाशिक
दिनांक : ०५.०४.२०२५

सही/- अधिकृत अधिकारी
निडो होम फायनान्स लिमिटेडसाठी,
(आधी एडलवाइस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे)

राजकोट नागरिक सहकारी बँक लि.
सांकेतिक ताबा सूचना (स्थावर मालमत्तेसाठी)

आर. ओ. आणि एच. ओ. : 'अरविंदभाई मणियार नागरिक सेवालय' १५०' रिंग रोड, राईया सर्कलजवळ, राजकोट. फोन : २५५५५५५

निम्नस्वाक्षरीकार राजकोट नागरिक सहकारी बँक लि., एच. ओ. राजकोटचे सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत कलम १३(२) अंतर्गत प्राधिकृत अधिकारी आहेत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियमावली, २००२ च्या नियमांच्या अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून खाली नमूद कर्जदार आणि हमीदारांना सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेली त्यांची देणी त्यावरील व्याजासह सूचनेच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत भरण्यासाठी मागणी सूचना जारी करण्यात आली होती आणि जसे की, ते रकमेचा भरणा करू न शकल्यामुळे, सूचना याद्वारे त्यांना आणि सामान्य जनतेला देण्यात येत आहे की, निम्नस्वाक्षरीकारांनी खाली वर्णन करण्यात आलेल्या मालमत्तेचा सुरक्षित कर्जाच्या वसुलीसाठी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियमावली, २००२ च्या नियम ८(१) सह वाचल्या जाणाऱ्या सरफेसी कायदा २००२ च्या कलम १३(४) अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून सांकेतिक ताबा घेतला आहे. विशेषत: कर्जदार आणि हमीदार आणि सामान्य जनतेला याद्वारे सावध करण्यात येत आहे की, मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि सदर मालमत्तेशी असा कोणताही व्यवहार राजकोट नागरिक सहकारी बँक लि., राजकोट यांच्याकडे खाली नमूद रक्कम त्यावरील ०१.०४.२०२५ पासून भरणा करण्यासाठी देय असतील.

शाखेचे नाव आणि खाते क्र.	कर्जदार/ हमीदार / संचालक/ भागीदारांचे नाव आणि जर बँकेने वृत्तपत्रामध्ये जाहीर सूचना जारी केल्यास त्याचा दिनांक आणि वृत्तपत्र तपशील	१३(२) अनुसार थकीत रक्कम आणि सूचना दिनांक	सांकेतिक ताब्याचा दिनांक	३१.०३.२०२५ अनुसार थकीत रक्कम
घाटकोपर ०६०००१४१०६०००००१४ (एसईसी/४८३७)	**कर्जदार (रां):** (१) म्हात्रे निकेश ज्ञानदेव **हमीदार (रां):** (१) म्हसकर विजेंद्र विलास (२) म्हात्रे ज्ञानदेव गणपत **'फायनान्शियल एक्स्प्रेस' आणि 'लोकसत्ता' दि. २५.१२.२०२४**	**रु. २२,९५,७४५.००** (३०.०९.२०२४ अनुसार) **१३(२) सूचना दिनांक :** २५.१०.२०२४	०३.०४.२०२५	**रु. २५,१८,०६१=००**

गहाण मालमत्तेचा तपशील

गट ग्रामपंचायत वावंगेच्या हद्दीमधील सर्वे क्र. ५७, हिस्सा क्र. २ सी गाव वावंगे मधील गाव वावंजे, ता. पनवेल, जिल्हा रायगड मधील 'गावदेवी गार्डन' म्हणून ज्ञात असलेल्या इमारतीच्या कॉम्प्लेक्सच्या के विंगच्या तळ मजल्यावरील गच्चीसह ४०७ चौ. फू. चटई क्षेत्रफळ असलेल्या सदनिका क्र. ०१ चा सर्व खंड आणि भूखंड. नोंदणीकृत पावती क्र. २८४३ दिनांकित २६.०२.२०१८ अंतर्गत एसआर. पीएच्हीएएल२-२३३७-२०१८ जे निकेश ज्ञानदेव म्हात्रे यांचे नावे आहे.

दि.: ०३.०४.२०२५, राजकोट

प्राधिकृत अधिकारी, राजकोट नागरिक सहकारी बँक लि., एच. ओ. वसुली विभाग, राजकोट.

डीसीबी बँक लि.
३०२, सेलो प्लॅटिना, एफ.सी.रोड, शिवाजीनगर, पुणे-४११००५

DCB BANK

ई-लिलाव विक्री सूचना

(सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ८(६) अंतर्गत)
सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ९(१) सहवाचता नियम ८(६) ची तरतूद सहवाचता सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

अधिकृत अधिकाऱ्यांकडून सर्वसाधारणपणे आणि विशेषत: कर्जदार, सह-कर्जदार आणि जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की, खाली नमूद केलेली मालमत्ता डीसीबी बँक लिमिटेड यांच्याकडे गहाण ठेवण्यात आली आहे, बँकेच्या अधिकृत अधिकाऱ्यांनी सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या तरतुदीनुसार ताबा घेतला आहे. कर्जदाराने लक्ष सरफेसी कायद्याच्या कलम १३ च्या उपकलम ८ यामधील तरतुदींकडे वेधले जात आहे, विक्रीसाठी निश्चित केलेल्या तारखेला सदर कायद्यात नमूद केलेल्या कोणत्याही पद्धतींचा अवलंब करून विमोचनाचा अधिकार संपुष्टात येईल. खाली नमूद केलेल्या देयके आणि पुढील व्याज, शुल्क आणि खर्च इत्यादी वसूल करण्यासाठी खाली नमूद केल्याप्रमाणे निविदा आणि जाहीर ई-लिलावाद्वारे मालमत्ता यांची विक्री करण्यात येतील. सदर या मालमत्तेची 'जसे आहे तिथे आहे' आणि 'जसे आहे जे आहे' आणि 'जे काही आहे ते आहे' या अटींवर विक्री करण्यात येतील, ज्यामध्ये डीसीबी बँक लिमिटेड यांना ज्ञात किंवा अज्ञात असलेल्या सर्व विद्यमान आणि भविष्यातील भार असतील, तर ते येथे दिलेल्या परिशिष्टात दिलेल्या आणि नमूद केलेल्या संक्षिप्त तपशिलांनुसार असतील.

अ. क्र.	कर्जदार आणि सह-कर्जदार, जामीनदार यांचे नाव	दि. ०३.०४.२०२५ पर्यंत एकूण देय थकबाकी (रु.)	आरक्षित किंमत (रु.)	ईएमडी (रु.)	ई-लिलावाची तारीख आणि वेळ	ताब्याचा प्रकार
१	**वर्षा अनिल खैरनार एचएचओएमएनएएस०००४४८१३**	**रु.** ८,२७,६४७/-	**रु.** ४,०५,०००/-	**रु.** ४०,५००/-	दि. २४.०४.२०२५ आणि दुपारी ०३.०० वा. ते दुपारी ०४.०० वा.पर्यंत	भौतिक

मालमत्तेचा पत्ता- दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्र. ०७, प्लॉट क्र. २१ वरील 'साई स्पर्श' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आरसीसी बांधलेल्या इमारतीत ३४.३८ चौरस मीटर, म्हणजेच ३७०.०० चौरस फूट क्षेत्रफळ असलेले बांधकाम क्षेत्रफळ, सर्व्हे क्र. ५५/१/१/२ मधील क्षेत्रफळ १९७.५० चौरस मीटर, जौलके दिंडोरी ग्रामपंचायत, तालुका-दिंडोरी, जिल्हा - नाशिकच्या हद्दीत येथे स्थितचे ते सर्व तुकडे आणि पार्सल आणि खालीलप्रमाणे सीमाबद्ध: पूर्वेकडे किंवा दिशेने: फ्लॅट क्रमांक ६, पश्चिमेकडे किंवा दिशेने: मार्जिन स्पेस आणि फ्लॅट क्रमांक २२, दक्षिणेकडे किंवा दिशेने: प्लॉट क्रमांक ७ आणि खुली जागा, उत्तरेकडे किंवा दिशेने: जिना आणि फ्लॅट क्रमांक ८ (सुरक्षित मालमत्ता)'

ईएमडी सादर करण्याची तारीख आणि वेळ २४.०४.२०२५ पूर्वी दुपारी १२.०० वाजेपर्यंत ईमेल आयडी- kuldeep.salokhe@dcbbank.com/vaibhav.chandanshive@dcbbank.com/kalpesh.verma@dcbbank.com यावर सहभागासाठी विनंती पत्र केवायसी, पॅन कार्ड, ईएमडीचा पुरावा यासहित

इच्छुक खरेदीदारांनी/बोलीदारांनी ईएमडी रक्कम डीसीबी बँक लिमिटेड यांच्या नावाने डिमांड ड्राफ्ट/पे ऑर्डरद्वारे जमा करणे आवश्यक आहे.

तपासणी तारीख आणि वेळ :- दि. ०७.०४.२०२५ सकाळी ११.०० वा. ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत.

नाशिक ठिकाणासाठी संपर्क व्यक्तीचे नाव - श्री. शैलेश कुलकर्णी ९७६५५५५६९९, कुलदीप साळोखे मोबा. ९८९०७४१०११.

ई-लिलावाच्या अटी आणि शर्ती-

(१) लिलाव विक्री ही 'ऑनलाइन ई-लिलाव' म्हणून https://sarfaesi.auctiontiger.net या वेबसाइटद्वारे वरील तक्त्यात नमूद केलेल्या तारखांना ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह बोली लावली जाईल.बोलीदारांना त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी आणि ई-लिलाव विक्री प्रक्रियेत भाग घेण्यापूर्वी लिलाव विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी https://sarfaesi.auctiontiger.net सदर ही वेबसाइट पाहण्याचा सल्ला देण्यात येत आहे. (२) इच्छुक बोलीदारांनी पोर्टलवर स्वत:ची नोंदणी करणे आणि लॉगीन आयडी आणि पासवर्ड आगाऊ घेणे आवश्यक आहे, जे ई-बिडिंगसाठी अनिवार्य आहे, लिलाव सेवा प्रदात्याकडून (मेसर्स ई-प्रोक्युअरमेंट टेक्नॉलॉजीज लिमिटेड (ऑक्शन टायगर) अहमदाबाद (टेलि.:- ०७९-६८१३६८३७/८०/९०, (एम) ९२६५५६२८२१ - ९२६५५६२८१८) संपर्क व्यक्ती: श्री. चिंतन भट्ट क्रमांक ९९७८५९१८८८, ईमेल : chintan.bhatt@auctiontiger.net, support@auctiontiger.net कृपया लक्षात ठेवा की, संभाव्य बोलीदार त्यांच्या नोंदणीकृत मोबाइल क्रमांकावरूनच ई-लिलावावर ऑनलाइन प्रशिक्षण घेऊ शकतात. (३) लिलाव प्रक्रियेत ऑनलाइन ई-लिलावात सहभागी होणे अनिवार्य आहे, विहित नमुन्यात अर्ज करून जो वेबसाइटवर ऑफर/निविदा दस्तऐवजासह उपलब्ध आहे. (४) बोलीदारांना https://www.dcbbank.com/cms/showpage/page/customer-corner या लिंकचा संदर्भ घेऊन बोली सादर करण्यापूर्वी लिलाव विक्रीच्या अटी आणि शर्तींचा तपशीलवार अभ्यास करावा आणि अधिक माहितीसाठी थेट श्री. कुलदीप साळोखे ९८९०७४१०११/ श्री. शैलेश कुलकर्णी ९७६५५५५६९९/ श्री. वैभव चंदनशिवे- ०२०६७२५३००१ आणि ८०१०६८७६५७/ श्री. कल्पेश वर्मा - ८६६८३८२०५१ डीसीबी बँक लिमिटेडचे अधिकृत अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.

दिनांक : ०५.०४.२०२५
ठिकाण : नाशिक

सही/-अधिकृत अधिकारी
डीसीबी बँक लिमिटेड
'सदर नोटिसीमध्ये नमूद केलेल्या सर्व मजकुराबाबतच्या अधिक स्पष्टतेसाठी इंग्रजी भाषेतील प्रसिद्ध केलेली नोटीस ग्राह्य धरण्यात येईल'

Home First Finance Company India Limited
CIN: L65990MH2010PLC240703
Website: homefirstindia.com
Phone No.: 180030008425 Email ID: loanfirst@homefirstindia.com

ताबा सूचना

संदर्भ : सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या रुल ८ च्या सब-रुल (१) अंतर्गत ताबा सूचना

ज्याअर्थी, **"होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड"**चे प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी संबंधित सूचनांच्या स्वीकृतीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत थकीत देणींच्या प्रदानाकरिता खालील नमूद केलेल्या तुमच्या नावे / ऋणकोंवर फर्माविण्याचा सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (२००२ चा ॲक्ट नं. ५४) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ रुल ३ यासह वाचलेल्या सेक्शन १३(२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत याखाली दिल्यानुसार त्यांच्या संबंधित तारखांदिवशी मागणी सूचना निर्गमित करण्यात आली आहे. तुम्ही / सर्व ऋणको, तथापी, विनिर्दिष्ट वेळेत उक्त थकीत देणींचे प्रदान करण्यास असमर्थ ठरला आहात, म्हणून **होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड**ने सरफेसी ॲक्ट, २००२च्या सेक्शन १३च्या सब-सेक्शन (४)च्या आणि त्याखालील वाचलेल्या रूल्सच्या तरतुदीअंतर्गत याखाली नमूद केल्यानुसार सुरक्षित मत्तेचा **ताबा** घेतला आहे.

अ. क्र.	ऋणको / सह-ऋणको / हमीदारांची नावे	गहाणवट मालमत्तेचे वर्णन	मागणी सूचनेची तारीख	मागणी सूचनेच्या तारखेनुसार एकूण थकीत रक्कम (आयएनआरमध्ये)	ताब्याची तारीख
1.	**उदलसिंह राजपूत**	**फ्लॅट नं. ६, बिल्डिंग डी-१०, गॅट नं. ५२/१, सारा आकुती फेज २, साई मंदिराजवळ, बजाजनगर, वळूज, औरंगाबाद-४३११३६.**	**09.03.2022**	**1,268,994**	**02.04.2025**

ऋणको रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत, ऋणको / हमीदार तसेच आम जनतेस याद्वारा सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी वर नमूद केलेल्या तारखे दिवशी उक्त रुलच्या रुल ८ यासह वाचलेल्या उक्त ॲक्टच्या सेक्शन १३(४) अंतर्गत त्याला / तिला प्रद